सांस्कृतिक कार्य संचालनालय
महाराष्ट्र शासन
आवक क्रमांक २१३...
दिनांक 11 JUN 2009
विभाग

संगीत रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार
कै.बळवंत पांडुरंग तथा अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे नांवे देण्याबाबत...............

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र.रंजीगौ-२००७/प्र.क्र.१९९/सां.का.३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक : २९ मे, २००९

वाचा : १) सांकासं २००५/प्र.क्र.३८८/सां.का.३, दिनांक २.३.२००६
२) संचालक, सांस्कृतिक कार्य यांचे सांकासं/२६२६, दिनांक १९.६.२००७

**प्रस्तावना :** नाटयकला ही महाराष्ट्रातील अत्यंत लोकप्रिय कला असून तिला १५० हून अधिक वर्षाची परंपरा आहे. महाराष्ट्र शासनातर्फे मोठया प्रमाणात हौशी नाटयस्पर्धा, व्यावसायिक नाटयस्पर्धा, बालनाटयस्पर्धा आयोजित करण्यात येतात. या स्पर्धांच्या माध्यमातून अनेक कलाकार, दिग्दर्शक मराठी रंगभूमीला लाभले आहेत.

महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्र भूषण पुरस्कार, व्ही.शांताराम पुरस्कार, राज कपूर पुरस्कार इ. पुरस्कार दिले जातात. त्याच धर्तीवर संगीत नाटय क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीसाठी (Life time achivement) महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्य संगीत जीवन गौरव पुरस्कार रुपये १,००,०००/- (रुपये एक लाख फक्त) देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :** संगीत जीवन गौरव पुरस्कार हा संगीत शाकुंतल नाटकाचा पहिला प्रयोग सन १८८० साली दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी झाला. त्या दिनांकास म्हणजे दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी प्रतिवर्षी संगीत नाटयक्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीसाठी (Life time achivement) राज्य संगीत जीवन गौरव पुरस्कार रु.१,००,०००/- (रुपये एक लाख फक्त) देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. विचारांती शासन या शासन निर्णयान्वये दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी संगीत नाटयक्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या कलाकारास संगीत जीवन गौरव पुरस्कार रु.१,००,०००/- व त्याच्या आयोजनासाठी रु.९७,५००/- अशा एकूण रु.१,९७,५००/- (रुपये एक लाख सत्त्याण्णव हजार पाचशे फक्त) इतक्या खर्चास शासन मान्यता देत आहे. खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | खर्चाचा तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | पुरस्काराची रक्कम | १,००,०००/- |
| २ | पुरस्कार विजेत्यांना प्रदान करण्यात येणाऱ्या मानचिन्हाचे डिझाईन तयार करुन घेणे मानधन (एकवेळासाठी खर्च) | २,५००/- |